# रामाचा उत्सव घरोघरी साजरा होणार; दीपोत्सवानिमित्त कंदिलांच्या मागणीत वाढ



■ठाणे। प्रतिनिधी,
आयोध्यातील राम मंदिराचे उद्घाटन आणि रामाच्या मूतीर्ची प्रतिष्ठापना या सोहळ्याचा उत्साह देशभरात पाहायला मिळत आहे. या सोहळ्यानिमित्त अनेक संस्था आणि कुटूंबाकडून दिपोत्सव साजरा करण्याची तयारी सुरु झाली आहे. या पार्श्वभूमीवर दिवाळीनंतर आता पुन्हा कंदिलाच्या मागणी वाढ झाल्याचे चित्र आहे. आयोध्यातील राम मंदिराच्या सोहळ्यानिमित्त बाजारात राम, हनुमान, मंदिर याचे छायाचित्र असलेले कंदिल विक्रीसाठी दाखल झाले आहेत. या कंदिलांना नागरिकांकडून मोठी मागणी असल्याचे ठाण्यातील कंदिल विक्रेत्यांनी सांगितले.

अयोध्येत २२ जानेवारीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणारे राम मंदिराचे उद्घाटन आणि मुतीर्ची प्रतिष्ठापना निमित्ताने देशभरात रामाचा जागर सुरू झाला आहे. या पार्श्वभूमीवर अनेक संस्था आणि कुटूंबाकडून दिपोत्सव साजरा करण्याची तयारी सुरु आहे. या सोहळ्याच्या अनुषंगाने ठाणे, मुंबई तसेच उपनगरातील बाजारपेठाही बहरलेल्या दिसून येत आहेत. रामाचे टी-शर्ट, साड्या तसेच विविध वस्तूंसह दिपोत्सव साजरा करण्यासाठी बाजारात कंदील दाखल झाल्याचे चित्र आहे. अनेक संस्था, गृहसंकुले तसेच सर्वसामान्य नागरिकांकडून कंदिल खरेदीसाठी मोठी मागणी आहे. राम, हनुमान, सीता तसेच मंदिर असे छायाचित्र असलेले पर्यावरण पूरक कंदिल आहेत. २५० ते ३५० रपये दराने प्रति कंदिल ची विक्री करण्यात येत आहे. गेले २० ते २५ दिवसांपासून या कंदिलाची मागणी वाढली आहे. मागणी नुसार हे कंदिर तयार करण्यात येत असल्याची माहिती कंदिल विक्रेत्यांनी दिली. दिवाळीनंतर पुन्हा एकदा आयोध्यातील राम मंदिर सोहळ्याच्या निमित्ताने कंदिलाच्या बाजारपेठेला बहर आला असल्याची प्रतिक्रिया कंदिल विक्रेते मधुसूदन डोईफोडे यांनी दिली.

# बॅनरबाजीतून पुन्हा एकदा राजकीय शक्तीप्रदर्शन, पालिकेचा कानाडोळा




■ठाणे। प्रतिनिधी,
संपूर्ण देश सध्या राम मंदिराच्या उद्घाटनाच्या निमित्ताने राम मय झाला आहे. ठाण्यातही सध्या तसेच वातावरण दिसत आहे. परंतु ठाण्यात या निमित्ताने पुन्हा एकदा बॅनरबाजीला उत आल्याचे चित्र शहरभर दिसत आहे. एकीकडे स्वच्छ ठाण्याचा नारा देण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र बॅनरबाजीने पुन्हा एकदा शहरातील महत्वाचे चौक, रस्ते, अगदी नव्याने रंग मारण्यात आलेल्या मेट्रोच्या पिलरवर देखील पुन्हा बॅनरबाजीतून शक्तीप्रदर्शन करण्याचा प्रयत्न केला जात आहे. विशेष म्हणजे महापालिका मुख्यालयाच्या समोरच जेथून आयुक्त व पालिकेचे इतर पदाधिकारी रोजच्या रोज ये जा करीत असतात, त्या परिसराला देखील बॅनरबाजीचा विळखा पडल्याचे चित्र आहे. परंतु या बॅनरबाजीकडे महापालिकेने जणू कानाडोळाच केला असल्याचे चित्र दिसत आहे. ठाणे महापालिकेच्या माध्यमातून मागील काही दिवसापासून अनाधिकृत बॅनर पोस्टरवर कारवाई केली जात असल्याचे दिसत होते. परंतु तो केवळ फार्स असल्याचेच स्पष्ट झाले आहे.

ठाण्यातील एकही रस्ता एकही चौक आज मोकळा श्वास घेतांना दिसत नाही. महापालिका मुख्यालयाच्या समोर कोणी भावी आमदाराचे बॅनर लावले आहेत, तर कोणी रामलल्लाचे बॅनर लावून शक्ती प्रदर्शन केले आहे. महापालिका मुख्यालयाजवळच कॉमन मॅनचा एक चौक आहे. परंतु आजच्या घडीला तो कॉमन मॅनही बॅनरबाजीच्या विळख्यात अडकल्याचे चित्र आहे. दुसरीकडे कॅसलमिल नाका येथील चौक, जांभळी नाका येथील चिंतामणी चौक आदींसह शहरातील इतर चौकही सध्या बॅनरबाजीने पुर्ते रंगले आहेत.

महापालिकेच्या माध्यमातून चौक सुशोभिकरणाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला होता. त्यानुसार काही चौकांनी एक वेगळी झळाळी मिळाली होती. परंतु आज ते चौकही या बॅनर बाजीच्या विळख्यात अडकल्याचे चित्र आहे. तिकडे शहरातील प्रमुख रस्त्यांवर ते अगदी गल्ली बोळातही सध्या बॅनरबाजीला उत आल्याचे चित्र आहे.

मेट्रोचे पिलर पुन्हा विद्रुप
मागील महिन्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शहर विद्रुप होणार नाही, या दृष्टीने उपाय योजना करावयात, तसेच मेट्रोच्या पिलरवर होणाऱ्या जाहीरातीबाजीच्या विरोधात देखील नाराजी व्यक्त केली होती.

# अयोध्येतील राम मंदिराच्या अक्षतांचा मान 'वाडा कोलम'ला, वाड्यातून १० टन कोलम रवाना



■वाडा । प्रतिनिधी,
येत्या २२ जानेवारीला अयोध्येतील राम मंदिरात रामलल्लाचा प्राणप्रतिष्ठा सोहळा होत आहे. या सोहळ्याला उपस्थित असलेल्या भक्तजनांना तांदळाच्या अक्षतांचे वाटप होणार आहे. या अक्षतांचा मान वाडा येथून उत्पादीत होणाऱ्या वाडा कोलमला मिळाला असून १० टन अक्षता वाडा येथून आयोध्येकडे रवानाही झाल्या आहेत.

अत्यंत चवदार असलेल्या, सेंद्रिय खतापासून उत्पादन केलेल्या वाडा कोलमला भारतातच नव्हे तर अनेक देशांतून मागणी वाढत आहे. अनेक खवय्यांच्या पसंतीस उतरलेल्या वाडा कोलमच्या अक्षता अयोध्येत लाखो भाविकांच्या हातात जाणार असल्याने वाडा कोलमचा हा मोठा सन्मान असल्याचे वाड्यातील वाडा कोलम उत्पादक शेतकऱ्यांकडून सांगितले जात आहे. वाडा कोलमचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणाऱ्या एका कृषी उत्पादन संस्थेने दोन दिवसांपूर्वी १० टन वाडा कोलमचा तांदूळ अयोध्येकडे रवाना केला. दिलेल्या दानाबाबत कुठेही वाच्यता होऊ नये म्हणून त्यांनी आपल्या संस्थेचे नाव उघड न करण्याचे सांगितले. दरम्यान पालघर जिल्ह्यात राममय वातावरण निर्माण होऊ लागले आहे. दररोज ठिकठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

# टपरीमाफियांना पालिकेचा दणका, मोक्याच्या ठिकाणची अतिक्रमणे हटविली



■नवी मुंबई। प्रतिनिधी,
महामार्गासह मोक्याच्या ठिकाणी अतिक्रमण करणाऱ्या टपरीमाफियांविरोधात महानगरपालिकेने मोहीम उघडली आहे. विनापरवाना व्यवसाय करणाऱ्या पिवळ्या, निळ्या टपऱ्या हटविल्या आहेत.तर बेवारस वाहने, अनधिकृत बॅनरही हटविण्यास सुरुवात केली आहे. मार्जिनल स्पेसचा व्यावसायिक वापर करणाऱ्यांनाही नोटिसा दिल्या आहेत. पालिकेच्या मोहिमेमुळे अतिक्रमण करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.

स्वच्छता अभियानात देशात तिसरा नंबर मिळविणाऱ्या नवी मुंबईत आता अतिक्रमणमुक्त शहर मोहीम राबविण्यास सुरुवात झाली आहे. अतिक्रमणविरोधी पथकाचे उपायुक्त राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण शहरभर कारवाईचा धडाका सुरू झाला आहे. सायन - पनवेल महामार्गावर वाशी ते नेरूळदरम्यान बसथांब्याच्या बाजूला विनापरवाना अनधिकृत टपऱ्या सुरू झाल्या होत्या.

टपरीमाफियांच्या वर्षानुवर्षांच्या अतिक्रमणांवर हातोडा चालविण्यास सुरुवात झाली आहे. मनपाच्या पथकाने सर्व टपऱ्या उचलण्यास सुरुवात केली आहे. यंत्राच्या साहाय्याने टपऱ्या उचलून डम्पिंग ग्राउंडवर नेण्यात येत आहेत. अतिक्रमणाचे पिवळे, निळे साम्राज्य खालसा झाले आहे. अनेक ठिकाणी विनापरवाना निराविक्री केंद्रे सुरू झाली होती. याशिवाय रात्री आइसक्रीम विक्रेत्यांनीही अनेक ठिकाणी व्यवसाय सुरू केला होता. या गाड्या उचलण्यासही सुरुवात केली आहे.

उपायुक्त राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेल्या मोहिमेचे नागरिकांनीही स्वागत केले आहे. अनेक अनधिकृत पानटपरी चालक महानगरपालिकेच्या परवानगीचा फलक लावून व्यवसाय करीत होते. महामार्गावरही जागा अडविली होती. बेवारस वाहनांमुळे शहर स्वच्छतेला अडसर निर्माण झाला होता.

मनपाने सर्व विभागांत कारवाई सुरू केल्यामुळे सामान्य नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. रस्त्यांवरील बेवारस वाहनांमुळे शहर स्वच्छतेमध्ये अडसर येऊ लागला होता.

# उल्हासनगरातील कचरा उचलणाऱ्या ठेक्याची पोलखोल



■उल्हासनगर। प्रतिनिधी,
शहरातील कचरा उचलणारी कंपनी अटीशतीर्चे उल्लंघन करीत असून कंपनीवर कारवाई करण्याची मागणी लढा कामगार संघटनेचे संदीप गायकवाड यांनी महापालिका आयुक्त अजीज शेख याना केली. तसेच पोलीस आयुक्त, पोलीस उपायुक्त, कामगार आयुक्त आदीना पत्र देऊन कामगारांचे प्रश्न सुटले नाहीतर, १ फेब्रुवारीपासून आंदोलनाचा इशारा देण्यात आला.उल्हासनगर महापालिकेने शून्य कचरा संकल्प करून शहरातील कचरा उचलण्याचा ठेका कोणार्क नावाच्या कंपनीला दिला. कचरा उचलण्यावर दिवसाला ८ लाख, महिन्याला २ कोटी ४० लाख तर वर्षाला ३० कोटी रुपये खर्च केला जातो. अशी माहिती लढा कामगार संघटनेचे संदीप गायकवाड यांनी दिली. ठेक्याच्या अटीशतीर्नुसार कामगारांचे नियमित पगार काढले जात नसून त्यांना आरोग्य सुविधा दिल्या जात नाही. तसेच शासनानुसार कमीतकमी पगार दिला जात नाही. असा आरोप लढा संघटनेचे अध्यक्ष संदीप गायकवाड यांनी केला. तसेच शहरातून एकून २०० मेट्रिक टन कचरा निघत असतांना तो जास्त करण्यासाठी डंपर मधून माती व दगड आणून वजन ४०० मॅट्रिक टन केला जात असल्याचा गंभीर आरोप गायकवाड यांनी केला.



# अंबरनाथ तालुक्यात भीषण पाणीटंचाई; पाच दिवसांतून एकदा पाणीपुरवठा

■अंबरनाथ। प्रतिनिधी,
अंबरनाथ तालुक्यातील लहान गावे तसेच पाड्यांमध्ये भीषण पाणीटंचाईची समस्या उद्भवल्याचे चित्र पहायला मिळत आहे. राज्य शासनाकडून जल जीवन मिशन पाणीपुरवठा योजनांची कामे सुरू असली तरी ही कामे पूर्ण होण्यास अद्याप अवधी आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील अनेक गाव, पाड्यांत पाच दिवसांतून एकदा पिण्याचे पाणी मिळत असल्याने पाण्यासाठी महिला, लहान मुलींची पाण्याच्या टाक्यांजवळ झुंबड उडत आहे.

नैसर्गिक जलस्रोत आणि मुबलक पाण्याचा साठा असलेल्या धरणांचा वेढा असलेल्या अंबरनाथ तालुक्यातील अनेक गावांमध्ये सध्या पाणीटंचाईची स्थिती आहे. अंबरनाथ तालुक्यात २८ ग्रामपंचायती आहेत. यातील अनेक गावे धरण क्षेत्रापासून हाकेच्या अंतरावर आहेत.

बदलापूरपासून जवळच असलेल्या चरगाव या ग्रुप ग्रामपंचायतीत आठ पाडे आहेत. प्रत्येक गावात आठशे ते हजार लोकवस्ती आहे. येथील नागरिकांना पिण्यासाठी मुबलक पाणी उपलब्ध नसल्याने मोठे हाल होत आहेत. गावात असलेल्या बोअरवेलमधील पाणी एका टाकीत साचवून ठेवले जाते. हे पाणी नागरिकांना पाच दिवसांतून एकदाच उपलब्ध होत असल्याने पाणी भरण्यासाठी टाकीजवळ गावातील महिला आणि लहान मुलींची एकच झुंबड उडते. सध्या या गावामध्ये जलजीवन मिशन पाणीपुरवठा योजनंतर्गत विहीर, पाण्याच्या टाक्या बांधण्याचे काम सुरू असून अनेक नवीन बोअरवेलची कामे सुरू असल्याचे पंचायत समितीच्या पाणीपुरवठा विभागाकडून सांगण्यात येत आहे. योजनांतर्गत ५० टक्के कामे पूर्ण झाली असून फेब्रुवारीपर्यंत ही कामे पूर्ण होणार असल्याची माहिती पाणीपुरवठा विभागाच्या अभियंत्यांनी दिली. शासकीय योजनांचा संथ कारभार पाहता नागरिकांना जानेवारी महिन्यातच पाच दिवसांतून एकदा पाणी मिळत असेल तर, येत्या उन्हाळ्यात येथील नागरिकांना पाण्यासाठी काही किलोमीटर वणवण करावी लागण्याच्या भीतीने ग्रामस्थ चिंतेत आहेत.

# काटई येथे जलवाहिनी फुटल्याने हजारो लिटर पाणी वाया



■डोंबिवली। प्रतिनिधी,
कल्याण शिळफाटा रस्त्यावरील काटई गाव हद्दीत गुरुवारी रात्री एमआयडीसीची जलवाहिनी फुटल्याने हजारो लिटर पाणी वाया गेले. जलवाहिनीतील पाणी रस्त्यावर आल्याने सुमारे अर्धा ते एक तास शिळफाटा रस्त्यावरील वाहतूक विस्कळीत झाली होती.एमआयडीसीची जलवाहिनी फुटण्याची या वर्षातील ही पहिलीच घटना आहे. मागील वर्षी सहा वेळा एमआयडीसीची जलवाहिनी फुटली होती. गुरुवारी रात्री काटई गावातील दुर्गा माता मंदिरासमोरील एमआयडीसी ची जलवाहिनी अचानक वॉल जवळ फुटली. अति उच्च दाबाने जलवाहिनीतून पाणी बाहेर येऊ लागल्याने जलवाहिनी शेजारील रहिवासी घाबरले. काही रहिवाशांच्या घरात जलवाहिनीचे पाणी घुसले. शिळफाटा रस्त्यावरील दुतर्फाची वाहतूक ठप्प झाली. जलवाहिनीच्या वरील भागातून उच्च दाबाच्या वीज वाहिन्या गेल्याने पाण्याचा संपर्क येऊन धोका निर्माण होण्याची भीती निर्माण झाली होती. स्थानिक रहिवाशांनी तातडीने एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांना कळवले. एमआयडीसीचे अभियंते आणि दुरुस्ती पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. जलवाहिनीचा बारवी धरणाकडून येणारा पाणीपुरवठा बंद करण्यात आला. जलवाहिनीतील आणि रस्त्यावरील पाणी ओसरल्यानंतर अभियंत्यांनी दुरुस्तीचे काम सुरू केले.

# प्रियसीचा खून करणाऱ्या प्रियकराच्या मृतदेहावर महिन्याभरानंतर हत्येचा गुन्हा दाखल




■पनवेल। प्रतिनिधी,
कळंबोलीतील प्रियकराने प्रियसीची हत्या केल्यानंतर केलेल्या आत्महत्या प्रकरणातील अनेक कंगोरे महिन्याभरानंतर उजेडात येत आहेत. १२ डिसेंबरला प्रियकराचा मृतदेह नेरुळ जुईनगरच्या रेल्वेरुळावर सापडला. मात्र महिन्याभरात खारघरच्या डोंगररांगात प्रियसीचा मृतदेह सापडू शकला नाही. मात्र तीन दिवसांपूर्वी मृतावस्थेत १९ वर्षीय वैष्णवी हीचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत सापडल्यानंतर कळंबोली पोलीसांनी कायद्याच्या चौकटीत राहून वैष्णवी हीची मृत प्रियकर वैभव बुरुंगले याच्याविरोधात हत्येचा गुन्हा दाखल केला. या प्रकरणात बेपत्ता वैष्णवीचा मृतदेह पोलीसांना शोधायला लागलेला विलंब हा आधुनिक पोलीसांच्या तपास यंत्रणेविषयी साशंकता निर्माण करणारा ठरला आहे. कळंबोलीतील दुहेरी हत्याकांडाच्या गंभीर प्रकरणाने अनेक प्रश्न नवी मुंबई पोलीसांच्या तपास यंत्रणेविषयी उभे केले आहेत. हत्या झालेल्या वैष्णवीचा मृतदेह शोधण्यासाठी इतके दिवस का लागले. नवी मुंबई पोलीसांच्या विशेष पथकाची स्थापना केली नसती तर अजून काही महिन्यात वैष्णवीचा मृतदेह त्याच ठिकाणी जमिनदोस्त होण्याची भिती व्यक्त केली जात आहे. स्थानिक कळंबोली पोलीस ठाण्यात मृत वैष्णवी हीच्या वडीलांनी दोन दिवसांपूर्वी दिलेल्या फीयार्दीमध्ये ते स्वता कळंबोलीतील एका शाळेच्या बसवर चालक म्हणून काम करतात. एक १३ वर्षाचा मुलगा आणि मुलगी वैष्णवीसह पत्नी असे हे कुटूंबिय सेक्टर ३ येथील एलआयजी येथे भाड्याच्या घरात राहतात. वैष्णवी ही सुधागड महाविद्यालयात शिकत असताना तीचे वैभव बुरुंगले याच्यासोबत प्रेम झाले. वैष्णवी ही त्यानंतर बीएस्सी डेटा सायन्स या पुढील शिक्षणासाठी मुंबई (शीव) एसआयएस महाविद्यालयात पहिल्या वर्षात शिकत होती. ऑक्टोबर महिन्यात वैभव आणि वैष्णवी यांच्यातील प्रेम असल्याची बातमी वैष्णवी हीच्या पालकांना समजल्यावर त्यांनी काही नातेवाईकांसह वैभव याच्या घरी जाऊन त्याच्या पालकांची भेट घेतली. वैभव हा कळंबोलीतील सेक्टर १६ येथील हंसध्वनी या सोसायटीत राहत होता. यापुढे वैष्णवी हीच्यासोबत कोणतेही संबंध ठेऊ नये अशी समज वैभवला दिल्यापासून वैष्णवी हीने कुटूंबियांचे ऐकत वैभवशी भेटणे सोडले. १२ डिसेंबरला वैष्णवी हीने वडिलांना फोनकरुन दुपारी सव्वादोन वाजता महाविद्यालय सूटले असून घरी येत असल्याचे सांगीतले.

# उल्हासनगरमधील भाजप नेत्यांच्या हत्येचा कट, कटात गोवण्याचा प्रयत्न असल्याचा भाजप जिल्हाध्यक्षांचा आरोप



■उल्हासनगर। प्रतिनिधी,
उल्हासनगर शहरातील भाजपच्या माजी जिल्ह्याध्यक्षासह इतर दोन लोकप्रतिनिधींच्या हत्येचा कट आखल्याबाबतचे पत्र विद्यमान जिल्हाध्यक्ष प्रदीप रामचंदानी यांनी उल्हासनगर पोलिस उपायुक्तांना दिले आहे. या हत्या मी घडवून आणणार असल्याचा कट आखत यात मला गोवण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही रामचंदानी यांनी केला आहे. भाजपाचे वादग्रस्त माजी नगरसेवक आणि उल्हासनगरचे विद्यमान जिल्हाध्यक्ष प्रदीप रामचंदानी यांनी उल्हासनगर पोलिस उपायुक्त यांना एक पत्र पाठवले. मला मिळालेल्या माहितीनुसार एका अज्ञात व्यक्तीस २५ लाख रुपयांची सुपारी देऊन उल्हासनगरमधील भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष जमनू पुरस्वानी, महेश सुखरामनी आणि अमित वाधवा यांच्यावर गोळीबार करण्यात येणार आहे, असे त्यांनी या पत्रात म्हटले आहे. हा हल्ला माज्या सांगण्यावरून करण्यात आला अशी खोटी साक्ष अज्ञात व्यक्ती पोलिस ठाण्यात देणार असल्याचेही त्यांनी यात म्हटले आहे. रामचंदानी यांच्या पत्राने शहरातील राजकीय वतुर्ळात खळबळ उडाली. या प्रकरणी सर्वांची नार्को चाचणी करण्यात यावी. यानंतर सत्य समोर येईल. केवळ पोलिस संरक्षण मिळवण्यासाठी हा सर्व प्रकार होत आहे, अशी प्रतिक्रिया अमित वाधवा यांनी दिली. तर याबाबत मी आमदार कुमार आयलानी यांच्यासोबत पोलिस उपायुक्त सुधाकर पठारे यांची भेट घेत तात्काळ योगत तो तपास करण्याची मागणी केली असल्याचे जमनू पूरस्वानी यांनी म्हटले आहे.

# उल्हासनगरच्या पाणी पुरवठा योजनेचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन भूमीपूजन



■उल्हासनगर। प्रतिनिधी,
महापालिकेच्या पाणी पुरवठा वितरण योजनेच्या दुसऱ्या टप्प्याचे भूमीपूजन शुक्रवारी सकाळी ११ वाजता गोलमैदान योगाकेंद्र येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन झाले. यावेळी आमदार कुमार आयलानी, महापालिका आयुक्त अजीज शेख यांच्यासह विविध पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. उल्हासनगर महापालिकेला केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजने अंतर्गत ४०० कोटींची पाणी पुरवठा वितरण योजना राबविली असून जुन्या जलवाहिनीच्या जागी नवीन जवाहिन्या टाकून १ भूमिगत जलकुंभासह ११ उंच जलकुंभ उभारण्यात आले. तसेच ५५ हजार पाणी मिटरसह पंपिंग स्टेशन उभारले. मात्र झोपडपट्टी परिसरात जलवाहिन्या टाकण्यात न आल्याने, योजना अपूर्ण राहिली होती. योजना पूर्ण करण्यासाठी महापालिकेने केंद्राकडे पाठपुरावा केल्यावर केंद्राच्या अमृत योजने अंतर्गत दुसऱ्या टप्प्यातील २२६ कोटीच्या योजनेला मंजूर मिळाली. त्या योजनेचे भूमिपूजन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शुक्रवारी ऑनलाईन झाले.

दुसऱ्या टप्प्यातील २२६ कोटीच्या पुरवठा वितरण योजने अंतर्गत जुन्या जलवाहिनीच्या ठिकाणी नवीन जलवाहिनी टाकणे, ४ नवीन जलकुंभ उभारणे, घरोघरी पाणी मीटर जोडणी आदी कामे केली जाणार असल्याची माहिती भूमिपूजन झाल्यानंतर महापालिका आयुक्त अजीज शेख यांनी दिली. दुसऱ्या टप्प्यातील योजना पूर्ण झाल्यावर शहरातील पाणी टंचाई निकाली निघणार असल्याची माहिती आयुक्त शेख यांनी दिली आहे. महापालिकेच्या पाणी पुरवठा वितरण योजनेच्या भूमिपूजन कार्यक्रमाला आमदार कुमार आयलानी महापालिका आयुक्त अजीज शेख.

# पोखरण रोड भागातील हजारो लघु उद्योजकांना दिलासा; नवे रोहित्र आणि विद्युत वाहिन्याही भूमिगत



■ठाणे। प्रतिनिधी,
गेल्या अनेक वर्षांपासून विद्युत पुरवठा खंडीत होऊन पोखरण रोड येथील लघु उद्योजकांना मोठा फटका बसत होता. अखेर विद्युत पुरवठ्याबाबत लघु उद्योजकांची चिंता मिटली आहे. महावितरण कंपनीने येथील उच्च आणि लघु दाब वाहिन्या भूमिगत केल्या असून नव्याने रोहित्र बसविले आहे. तसेच उद्योगासाठी स्वतंत्र विद्युत वाहिन्या उपलब्ध करण्यात आल्या आहेत. त्यामुळे आता येथील उद्योजकांना त्यांचा व्यवसाय विना अडथळा करणे शक्य होणार आहे.

पोखरण रोड येथील उपवन भागात १ हजार २०० लघु उद्योजकांचे कारखाने आहेत. दरवर्षी येथील लघु उद्योगांमधून १०० कोटी रुपयांची उलाढाल होत असते. यातील बहुतांश कारखाने अभियांत्रिकी स्वरूपातील आहे. तसेच १० ते १५ हजार कामगार, मजूरांना याठिकाणी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या रोजगार उपलब्ध होतो. काही लघु उद्योगांमधून मोठ्या कंपन्यांनाही यंत्र उपलब्ध करून दिले जाते. त्यामुळे येथील कारखाने अत्यंत महत्त्वाचे आहे. असे असले तरी येथील उद्योजकांना विद्युत पुरवठा खंडित होण्याच्या समस्येला सामोरे जावे लागत होते. येथील विद्युत वाहिन्या ओव्हरहेड स्वरूपात होत्या.

त्यामुळे पावसाळ्यात विद्युत पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढत होते. तसेच ज्या रोहित्रामधून येऊर भागातील रहिवाशांना विद्युत पुरवठा होतो. त्याच रोहित्रामधून येथील कारखान्यांनाही विद्युत पुरवठा केला जात होता. त्यामुळे अनेकदा विद्युत वाहिनींवर दाब येत होता. यासंदर्भात येथील पोखरण लेक स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशन या लघु उद्योजकांच्या संघटनेने जिल्हा उद्योग केंद्र तसेच महावितरणकडे वारंवार पाठपुरावा केला होता.

# अयोद्धेतील राममंदीराच्या प्राणपतिष्ठा सोहळ्यात निवड झाली या बातमीनेच घरात दिवाळी साजरी झाली



■पनवेल। प्रतिनिधी,
२२ जानेवारीला अयोद्धा येथे होत असलेल्या प्रभु रामचंद्राच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात देशभरातील ११ जोडप्यांना विशेष निमंत्रित केले आहे. यामध्ये खारघर वसाहतीमधील विठ्ठल आणि त्यांची पत्नी उज्वला कांबळे यांचाही समावेश आहे. कांबळे यांच्याशी बातचित केल्यावर त्यांनी ३ जानेवारीला अयोद्धा येथे होत असलेल्या सोहळ्याचे निमंत्रण मिळाल्यानंतर घरात दिवाळी साजरी होत असल्याची भावना प्रसारमाध्यमांशी बोलताना व्यक्त केली. अयोध्येतील राम मंदिर लोकार्पण सोहळ्याची तयारी शेवटच्या टप्यात आहे. अयोद्धयाचे नव्हेतर देशभरातील विविध उपनगरांमधील बाजारपेठा राममय झाल्या आहेत. भाजपतर्फे विविध उपनगरांमध्ये नमो चषकचे क्रीकेट सामने भरुन युवांना एकत्रित केले जात आहे. मंदीर न्यासाच्या कार्यक्रमात देशातून नव्हेतर परदेशातून जोरदार तयारी सूरु असून अनेक मान्यवर वेळात वेळ काढून रामांचे दर्शनासाठी नियोजन करत आहे. या दरम्यान ३ जानेवारीला अयोद्धा येथील मंदीरात राममुतीर्ची प्राणप्रतिष्ठा होत असताना ११ विशेष जोडप्यांना बोलावण्यात येत आहे. यामध्ये नवी मुंबईतील खारघर येथे राहणारे विठ्ठल कांबळे यांनी त्यांच्या भावना व्यक्त करताना ३ जानेवारीला निमंत्रणाचा फोन आल्यावर कांबळे कुटूंबियांचे आनंदाश्रु अनावर झाल्याचे त्यांनी सांगीतले.

# 'अयोध्येतील श्री राम मंदिराचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी राजीव गांधींनी प्रयत्न केले

■नागपूर। प्रतिनिधी,

अयोध्येतील राम मंदिरावरुन काँग्रेसवर केली जात असलेली टीका चुकीची आहे. पंतप्रधान राजीव गांधी यांनीच अयोध्येतील श्रीराम मंदिराचे दरवाचे उघडून श्रीराम दर्शनाची व्यवस्था केली व शिलान्यासही त्यांच्याच काळात झाला. राम मंदिराचा प्रश्न मार्गी लावण्यासाठीही राजीव गांधी यांनी प्रयत्न केले पण राजीव गांधींच्या प्रस्तावाला भाजपने त्यावेळी विरोध केला होता, मग आता मंदीर कुठे बांधत आहेत, असा सवाल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला. नागपुर येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना पटोले म्हणाले की, महाराष्ट्र हे छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे



राज्य आहे. जेव्हा जेव्हा लोकशाही, संविधान संपवण्याचा प्रयत्न झाला तेव्हा या महाराष्ट्राने लोकशाही आणि संविधान मानणाऱ्यांना ताकद दिली. जातीच्या व धर्माच्या नावाने राजकारण करणारा भाजप संविधान व्यवस्था संपवू पाहत असताना महाराष्ट्रातील जनतेने आज पुन्हा छत्रपती शिवाजी महाराज, शाहू, फुले व आंबेडकरांच्या विचाराला ताकद देण्याचा संकल्प केलेला आहे. महाराष्ट्रात भारतीय जनता पक्षाचा मोठा पराभव स्पष्ट दिसत आहे. म्हणूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना वारंवार महाराष्ट्रात प्रचाराला यावे लागत आहे.

सोलापुरातील विडी घरकुल योजना ही डॉ. मनमोहनसिंह यांच्या नेतृत्वाखालील युपीए सरकारची आहे, या योजनेच्या चाव्या द्यायला पंतप्रधान नरेंद्र मोदी आले आहेत. चाव्या देणे एवढीच मोदी गॅरंटी आहे. युपीए सरकारच्या काळातील ही योजना पूर्ण करण्यास मोदी सरकारला १० वर्षे लागली. विडी घरकुलबददूल मोदींची गॅरंटी म्हणजे ह्यखोटं बोल पण रेटून बोलह्व अशी आहे. नरेंद्र मोदी हे देशाचे पंतप्रधान आहेत, त्यांनी असे खोटे बोलू नये. परवाच मुंबईतील सागरी सेतूच्या उद्घाटनाला पंतप्रधान मोदी आले होते. नरेंद्र मोदी हे पंतप्रधान कमी व प्रचारप्रमुख जास्त वाटतात, असा टोलाही पटोले यांनी लगावला.

राहुल गांधी यांना अटक करु, असे आसामचे मुख्यमंत्री म्हणत आहेत, त्यावर प्रतिक्रिया देताना नाना पटोले म्हणाले,ते हुकूमशाहीवृत्तीचे लोक आहेत ते असेच बोलणार. राहुल गांधींना भाजप घाबरते त्यातूनच कारवाईची धमकी दिली आहे.

# बाशी बेहनवाल टोळीवर मोक्का




■नाशिक। प्रतिनिधी,

लूटमार, प्राणघातक हल्ला असे आरोप असणाऱ्या बाशी उर्फ शिवम बेहनवाल टोळीवर शहर पोलिसांनी केलेल्या मोक्का कारवाईस अप्पर पोलीस महासंचालकांनी शिक्कामोर्तब केले आहे. या टोळीविरोधात मोक्का न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्याचे आदेश अप्पर महासंचालकांनी दिले आहेत.

बाशी उर्फ शिवम उर्फ शुभम बेहनवाल (२३, रा.फर्नांडिसवाडी, जयभवानी रोड), नेम्या उर्फ रोशन पवार (रा.निलगिरीबाग,औरंगाबाद रोड), अमन वर्मा (रा.वंदे मातरम अपार्टमेंट, औटेमळा), भैयू उर्फ सत्यम ढेनवाल (रा.एकलहरारोड,हनुमाननगर), रोहन राठोड उर्फ पियुष खोडे, सुधांशू उर्फ सोनू बेद (रा. दोघे फर्नांडिसवाडी, नाशिकरोड), मोहिज शेख (रा. विठ्ठल मंदिराजवळ, विहितगाव), बिडी उर्फ गौरव मुकणे (रा. देवळाली कॅम्प), चिक्या उर्फ मितेश परदेशी (रा.देवळाली कॅम्प), शाहिद सय्यद (रा. पाटील गॅरेज मागे, देवळाली गाव) आणि भावेश उर्फ गौरव आव्हाड (रा. देवळालीगाव) अशी मोक्कान्वये कारवाई करण्यात आलेल्या बाशी बेहनवाल टोळीतील सदस्यांची नावे आहेत.

बाशी बेहनवाल टोळीची नाशिकरोडसह,जेलरोड,जयभवानीरोड आणि देवळाली गाव परिसरात मोठी दहशत आहे. खून, खूनाचा प्रयत्न, लूट असे गुन्हे करून या टोळीने परिसरात मोठी दहशत माजवली. २४ जुलै रोजी एकास जीवे मारण्याची धमकी देत या टोळीने लुटमार केली होती. या घटनेत खिशातील रोकड बळजबरीने काढून घेत या टोळीने सदर व्यक्तीच्या डोक्यात धारदार शस्त्राने हल्ला करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला होता. तसेच परिसरातील वाहनांची तोडफोड केली होती. याप्रकरणी उपनगर पोलीस ठाण्यात जबरी लुटीसह प्राणघातक हल्ला व विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी या टोळीतील सदस्यांना अटक केल्यावर पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी या घटनेची गंभीर दखल घेतली.

# शिवशाही बसच्या धडकेत ज्येष्ठ महिलेचा मृत्यू

■पुणे। प्रतिनिधी,

शिवशाही बसच्या धडकेत पादचारी ज्येष्ठ महिलेचा मृत्यू झाल्याची घटना स्वारगेट परिसरातील देशभक्त जेधे चौकात घडली. याप्रकरणी बसचालकाविरुद्ध स्वारगेट पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

कस्तुरीबाई रतनलाल राठोड (वय ७५) असे मृत्युमुखी पडलेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी शिवशाही बसचालक करण प्रकाश बहादुर (वय ३२,रा. गार्निश बिल्डींग, आंबेगाव पठार, धनकवडी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत राठोड यांची नात सोनाली रवींद्र पुजारी (वय ३३, रा. अप्पर इंदिरानगर, बिबवेवाडी) यांनी स्वारगेट पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

राठोड स्वारगेट येथील देशभक्त केशवराव जेधे चौकातून निघाल्या होत्या. त्यावेळी रस्ता ओलांडणाऱ्या राठोड यांनी शिवशाही बसने धडक दिली. अपघातात गंभीर जखमी झालेल्या राठोड यांचा उपचारांपूर्वीच मृत्यू झाला होता. पोलीस उपनिरीक्षक जगताप तपास करत आहेत.

# पुण्याच्या खराब हवेचा केंद्रीय मंत्र्यांना फटका




■पुणे। प्रतिनिधी,

गेल्या काही दिवसांत किमान तापमानात घट झाल्याने पुणे आणि परिसरात गारवा वाढला आहे. गुलाबी थंडीमुळे वातावरण आल्हाददायक झाले असले, तरी हवेमध्ये प्रदूषणकारी धुलिकणांचे प्रमाण वाढल्याने हवेची गुणवत्ता खालावल्याचे दिसून येत आहे. त्याचा फटका पुणे दौऱ्यावर आलेल्या चक्क केंद्रीय मंत्र्यांना बसला आहे. हे मंत्री पुण्यात आल्यानंतर आजारी पडले असून त्याला प्रशासनाकडूनही दुजोरा देण्यात आला आहे.

केंद्रीय पर्यावरण, वने आणि हवामान बदल राज्यमंत्री अश्विनीकुमार चौबे हे बुधवारपासून पुणे दौऱ्यावर आले आहेत. बुधवारी त्यांनी शहरातील धनकवडी परिसरात भारत संकल्प यात्रा अंतर्गत कार्यक्रमात भाग घेतला होता. तसेच गुरुवारी भारत संकल्प यात्रा अंतर्गत वडगाव शेरी भागातील कार्यक्रमात ते सहभागी झाले होते. शुक्रवारी सकाळी सिंहगड रस्त्यावरील पु. ल. देशपांडे उद्यान येथे महापालिकेच्या समाजविकास विभागामार्फत आयोजित खाद्यमहोत्सवाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात येणार होते.

पुणे : गेल्या काही दिवसांत किमान तापमानात घट झाल्याने पुणे आणि परिसरात गारवा वाढला आहे. गुलाबी थंडीमुळे वातावरण आल्हाददायक झाले असले, तरी हवेमध्ये प्रदूषणकारी धुलिकणांचे प्रमाण वाढल्याने हवेची गुणवत्ता खालावल्याचे दिसून येत आहे. त्याचा फटका पुणे दौऱ्यावर आलेल्या चक्क केंद्रीय मंत्र्यांना बसला आहे. हे मंत्री पुण्यात आल्यानंतर आजारी पडले असून त्याला प्रशासनाकडूनही दुजोरा देण्यात आला आहे.

केंद्रीय पर्यावरण, वने आणि हवामान बदल राज्यमंत्री अश्विनीकुमार चौबे हे बुधवारपासून पुणे दौऱ्यावर आले आहेत. बुधवारी त्यांनी शहरातील धनकवडी परिसरात भारत संकल्प यात्रा अंतर्गत कार्यक्रमात भाग घेतला होता. तसेच गुरुवारी भारत संकल्प यात्रा अंतर्गत वडगाव शेरी भागातील कार्यक्रमात ते सहभागी झाले होते. शुक्रवारी सकाळी सिंहगड रस्त्यावरील पु. ल. देशपांडे उद्यान येथे महापालिकेच्या समाजविकास विभागामार्फत आयोजित खाद्यमहोत्सवाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात येणार होते.

भामट्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवून तक्रारदार महिलेने जवळील दोन लाख 66 हजाराचा सोन्याचा ऐवज पिशवीत गुंडाळला. हा ऐवज कुणी चोरू नये म्हणून भामट्यांनी स्वतःजवळ घेतला. आपणास रामाचे दर्शन होत आहे या आनंदात महिला होती.

# नवऱ्याचा पाठिंबा, कुटुंबाची साथ; 'एमपीएससी'त मुलींमध्ये पूजा वंजारी राज्यात अव्वल



■पिंपरी चिंचवड। प्रतिनिधी,

एमपीएससीच्या स्पर्धा परीक्षेमध्ये राज्यात मुलींमध्ये पिंपरी- चिंचवडची पूजा वंजारी अव्वल आली आहे. संसार आणि अभ्यास अशी कसरत करून तिने हे यश संपादन केल्याने तिचे विशेष कौतुक होत आहे. पूजाला तिच्या पतीचा पाठिंबा मिळाला. एक वेळ स्वयंपाक राहू दे मात्र अभ्यास कर, असं तिच्या पतीने ठणकावून तिला सांगितलं. स्पर्धा परीक्षेसाठी पती खंबीरपणे पाठीशी उभे राहिले, असं पूजाने लोकसत्ता ऑनलाइनशी बोलताना सांगितले. ९०० पैकी ५७०.२५ गुण मिळवत पूजा राज्यात मुलींमध्ये अव्वल आली आहे. शैक्षणिक आणि शेतकरी कुटुंबाची पार्श्वभूमी असलेल्या पूजाला आपण अधिकारी होऊ शकतो असा विश्वास आधीपासूनच होता. तो खऱ्या अर्थाने एमपीएससी उत्तीर्ण करत तिने सत्यात उतरवला आहे. आठव्या वेळी ती यश संपादन करू शकली.पुढे ती म्हणाली, एमपीएससीमध्ये यशापेक्षा अपयश जास्त बघावं लागतं हे तितकंच खरं आहे. ते माझ्या बाबतीत खरंही ठरलं. कोविड काळात स्पर्धा परीक्षा पुढे ढकलल्या गेल्या. यामुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागला. या यशात कुटुंबाचा मोठा वाटा आहे. माझं लग्न झालेलं आहे. लग्नानंतर अनेक गोष्टी बदलतात. अनेक मुली लग्नानंतर शिक्षणाबाबतची स्वप्न तिथेच सोडून देतात. माझ्या बाबतीत मात्र पतीचे खूप सहकार्य मला मिळाले. माझे पती खंबीरपणे पाठीशी उभे राहिले. घरात एक वेळ स्वयंपाक करू नकोस पण अभ्यास कर, असं पती नेहमी म्हणायचे असं पूजा म्हणाली.

# विद्येच्या माहेरघरात अघोरी प्रकार; मुलाला मानसिक आजारातून मुक्त करतो असे सांगत लुटले

■पुणे। प्रतिनिधी,

विद्येच्या माहेरघरात धक्कादायक अघोरी प्रकार पुन्हा घडला आहे. मुलाचा मानसिक आजारातून मुक्त करण्यासाठी फियार्दीकडून वेळो वेळी तब्बल ३५ लाख रुपये लुटले आहेत, हा सगळा प्रकार २०१६ पासून ते आतपर्यंत घडत आला आहे. मात्र मुलावर करण्यात आलेल्या अघोरी कृत्याचा काही परिणाम पडला नाही म्हणून पुन्हा ५० लाख रुपयेचा खर्च आणि एक नरबळी द्यावी लागेल, असे सांगितले या जाचाला कंटाळून फियार्दी यांनी चंदननगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

चंदननगर पोलिसांनी फियार्दीने दिलेल्या तक्रारीनुसार पोलिसांनी चारुदत्ता संजय मारणे (वय ३१ रा. बिपाणी वस्ती आंबेगाव पुणे ) पूनम घनश्याम कोहांडे (वय ३८) नीलम राहुल जाधव (वय ३५) देविका अमित जुन्नलकर (वय ३० रा. उत्सव वेल्डिंग पुणे), संतोष मारुती येणपुरे (वय ४५) असं सगळ्या आरोपींची नाव आहेत.

या घटनेबाबत अधिक माहिती अशी आहे की, फियार्दी यांचा मुलगा वेदांत रविंद्र गायकवाड हा जन्मापासून मानसिकरित्या दुर्बल आणि आजारी आहे. तसेच घरात ही इतर आडी अडचणी पण खूप आहेत. ही गोष्ट आरोपी यांना समजल्यावर त्यांनी फियार्दीचा विश्वास संपादन करून अघोरी विद्या व जादूटोणा प्रयोग करून मुलाला आजर मुक्त करू असे खोटे आश्वासन देऊन फियार्दी यांच्याकडून वारंवार पैसे घेत तब्बल ३५ लाख रुपये घेतले. तसेच अजून ५० लाख आणि एक नरबळी द्यावा लागेल नाही तर मुलाचा आणि पतीचा मृत्यू होईल, असे खोत सांगितले.

# अधिकृत कंपनीव्यतिरिक्त अन्य ज्ञात-अज्ञात कंपन्यांना पॅनकार्ड सेवा देण्यास मज्जाव


■मुंबई। प्रतिनिधी,

सरकारी मालकीच्या यूटीआय इन्फ्रास्ट्रक्चर टेक्नॉलॉजी अँड सर्व्हिसेस लिमिटेडच्या (यूटीआय आयटीएसएल) वतीने पॅनकार्ड सेवा प्रदान करत असल्याचा दावा करणाऱ्या संकेतस्थळांना ही सेवा देण्यापासून उच्च न्यायालयाने मज्जाव केला आहे. या संकेतस्थळांकडून दिली जाणारी सेवा बेकायदा असून त्यांची ही कृती राष्ट्रीय सुरक्षा धोक्यात घालणारी आहे, अशी टिप्पणी न्यायालयाने



या प्रकरणी एकतर्फी आदेश देताना केली. भारत सरकारने पॅनकार्ड आधार कार्डशी संलग्न करणे अनिवार्य केले आहे. पॅनकार्ड हा नागरिकत्वाची ओळख पटवणारा स्वीकारार्ह पुरावा मानला जातो. त्यामुळे, त्याचा कोणाकडूनही संभाव्य गैरवापर होऊ शकतो आणि ते केवळ कंपनीच नाही, तर देशाच्या सुरक्षेसाठी धोकादायक ठरू शकते. म्हणून, या प्रकरणी प्रतिवादींनी नोटीस न बजावता पॅनकार्ड सेवा प्रदान करण्यास मज्जाव करणारा एकतर्फी आदेश देणे आवश्यक आहे, असे न्यायमूर्ती भारती डांगरे यांच्या एकलपीठाने प्रामुख्याने नमूद केले.

# रेल्वेने प्रवास करताना सतर्क राहा, चोरीच्या घटनांमध्ये दुपटीने वाढ



■नागपूर। प्रतिनिधी,

रेल्वे प्रवासादरम्यान प्रवासी आणि त्यांच्या वस्तू सुरक्षित नसल्याचे रेल्वेत होणाऱ्या चोरीच्या घटनांच्या आकेडवारीवरून दिसून येते . तीन वर्षांत धावत्या रेल्वेत चोरीच्या घटनांमध्ये तब्बल दुपटीने वाढ झाली आहे.रेल्वेने प्रवास करणाऱ्यांची संख्या वाढत आहे. त्या तुलनेत रेल्वेगाड्यांची आणि रेल्वे सुरक्षा दलातील जवानांची संख्या वाढताना दिसत नाही. त्याचा परिणाम रेल्वेच्या आरक्षित डब्यात प्रवाशांच्या वस्तू चोरी होण्याचे प्रमाण वर्षागणिक वाढत आहे. २०२१ मध्ये ६८२ चोरीच्या घटना घडल्या होत्या. पुढल्या वर्षी ११६० घटना घडल्या आणि ३१ ऑक्टोबर २०२३ पर्यंत १३२४ चोरीच्या घटनांची नोंद करण्यात आली आहे, असा तपशील माहिती अधिकारात अभय कोलारकर यांना प्राप्त झाला आहे. नागपूरमार्गे धावणारी पुणे ते हटिया एक्सप्रेसमध्ये अलीकडे तृतीयपंथीयांनी रात्री प्रवाशांना लुटण्याची घटना घडली. त्याबाबत भारतीय यात्री केंद्राने रेल्वे मंत्रालयाला पत्र लिहून प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न उपस्थित केला होता.

याबाबत या केंद्राचे अध्यक्ष बसंतकुमार शुक्ला म्हणाले, रेल्वेत तिकीट तपासणींची पदे रिक्त आहेत. रेल्वे सुरक्षा दलाचे नागपूर विभागातील दोन हजार पदे रिक्त आहेत. रेल्वेगाडी २१ ते २५ डब्यांची असते. साधारणतः एका टीटीई तीन-चार डब्यांमध्ये तिकीट तपासणी करीत असतात.

# महालक्ष्मी रेसकोर्सवर कोणतेही बांधकाम नाही, महापालिका आयुक्त इक्बाल सिंह चहल यांची सदस्यांना ग्वाही

■मुंबई। प्रतिनिधी,

महालक्ष्मी रेसकोर्सवर कोणतेही बांधकाम करण्यात येणार नाही, याठिकाणी उद्यान आणि हिरवळ तशीच राहील, अशी ग्वाही पालिका आयुक्त इक्बाल सिंह चहल यांनी दिली आहे. रेसकोर्स व्यवस्थापनाच्या खुल्या आमसभेत त्यांनी सदस्यांच्या उपस्थितीत ही ग्वाही दिली. तसेच या प्रस्तावात कोणत्याही बांधकाम व्यावसायिकाचा काहीही संबंध नाही, असेही त्यांनी म्हटले आहे.

महालक्ष्मी येथील रेसकोर्सच्या बहुचर्चित पुर्नविकास प्रस्तावाबाबत रेसकोर्सच्या व्यवस्थापनाला गुरुवारी झालेल्या खुल्या सभेत स्वतः पालिका आयुक्तांनी माहिती





दिली. रेसकोर्सच्या भाडेकराराचे नूतनीकरण करण्यात येणार असून रेसकोर्सच्या २२६ एकर जागेपैकी १२० एकर जागा पालिकेला संकल्पना उद्यान (थीम पार्क) उभारण्यासाठी द्यावी याबाबतचा हा प्रस्ताव आहे. या प्रस्तावानुसार १२० एकर जागेवर उद्यान साकारले जाणार असून ते सागरी किनारा मार्गावरील उद्यानाला भूमिगत मार्गाने जोडले जाणार आहे.

पालिका आयुक्त चहल यांनी गुरुवारच्या सभेत आधी सादरीकरण केले व त्यानंतर सदस्यांच्या सर्व प्रश्नांची उत्तरे दिली. संध्याकाळी सात वाजल्यापासून ते रात्री साडेआठ वाजेपर्यंत ही बैठक सुरू होती. महालक्ष्मी रेसकोर्स येथे पार पडलेल्या या बैठकीला पालिकेच्या संबंधित विभागाचे अधिकारी, तसेच रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब (आरडब्ल्यूआयटीसी) म्हणजेच रेसकोर्स व्यवस्थापनाचे पदाधिकारी आणि सदस्य उपस्थित होते. सदस्यांनी यावेळी मोठ्या प्रमाणावर प्रश्नांचा भडीमार केला. या सर्व प्रश्नाची आयुक्तांनी उत्तरे दिली. दरम्यान, रेसकोर्सचा भाडेकरार करण्यासाठी या प्रस्तावाला समर्थन करण्याची अट का घातली जात आहे, असा सवाल काही सदस्यांनी उपस्थित केला होता. तर थीम पार्क उभारताना हिरवळ कशी टिकवणार असेही प्रश्न उपस्थित करण्यात आले होते.

# कृषी विज्ञान केंद्राच्या प्रात्यक्षिक प्रक्षेत्रावर कृषिक प्रदर्शन सुरू; मुका घेणारा बैल बनतोय चर्चेचा विषय

■बारामती। प्रतिनिधी,

येथील शारदानगर येथे सध्या एग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट संचलित कृषी विज्ञान केंद्राच्या प्रात्यक्षिक प्रक्षेत्रावर कृषिक प्रदर्शन सुरू आहे. भारतातील हे सर्वात मोठे शेतीची प्रात्यक्षिके असणारे प्रदर्शन म्हणून पाहिले जात आहे. यावर्षी या प्रदर्शनात पशुपक्ष्यांचे देखील प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

यामध्ये दौंड तालुक्यातील नंदादेवी येथील संतोष बापूराव कोकणे यांची सोन्या आणि मोन्या हे काजळी खिल्लार बैल सर्वांचेच लक्ष वेधून घेत आहे. त्याला कारणही तसेच आहे हे बैल मालकाच्या सूचनेप्रमाणे चक्क मुका देतो.



कोकणे यांनी सोन्या आणि मोन्या या जातीवंत बैलांची माणसाप्रमाणे निगा राखली आहे. नुकत्याच चालू बोलू लागलेल्या लहान बाळाला आपण जशा सूचना देतो आणि ते बाळजसे त्याचे पालन करते, अगदी त्याचप्रमाणे हे बैल पाटावर उभा रहा म्हटले की पाटावर उभा राहतो. मुका घे म्हटले घेतात. माणसाप्रमाणे दिलेल्या सूचनांचे पालन करत असल्याने या बैलांना पाहण्यासाठी कृषी प्रदर्शनाला आलेले शेतकरी मोठ्या संख्येने गर्दी करत आहेत. या संदर्भात कोकणे यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी सांगितले की, पंढरपूर येथून नऊ महिन्याचा खोंड आणला होता. त्याला सगळ्यांचा एवढा लळा लागला की, तो सगळ्या घरात बसून असायचा. पुढे त्याची उंची वाढल्यानंतर त्याच्यासाठी गोठा तयार करण्यात आला. परंतु या दरम्यानच्या काळात तो लहान मुलांशी एवढा मिसळून गेला की, त्याचे हे वागणं बघून तो पप्पी देतोय, असे सगळ्यांना वाटू लागलं आणि साहजिकच त्याची सगळ्यांना सवय झाली. पूर्वी पप्पी दे पप्पी दे पारुला हे गाणं चर्चेत होतं आणि आता हे बैल सध्या चांगलेच चर्चेत आले आहे. खरंतर मुका देणारा बैल म्हटल्यानंतर सगळीकडे चर्चा अशी होती की उपहासात्मक बोलले जात आहे. कारण कधी कधी नवऱ्याला देखील बैल म्हटले जाते, परंतु तसे नसून हा प्रत्यक्षात बैल आहे आणि तो मुका देतो.

# डोंबिवलीत फडके रोडची पाणी मारून सफाई; राम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठेनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन





■डोंबिवली। प्रतिनिधी,

डोंबिवलीतील फडके रोडवर अयोध्येतील राम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठेनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. यानिमित्ताने फडके रोडची शुक्रवारी सकाळी टँकरद्वारे पाणी मारून सफाई करण्यात आली.तसेच या रस्त्यावरील फेरीवाल्यांचे पक्क्या बांधकामाचे मंच जेसीबीच्या साह्याने तोडून टाकण्यात आले.

फडके रोडवर सकाळीच टँकर मधून पाणी मारून स्वच्छता केली जात असताना नागरिक, व्यापारी आश्चर्यचकित होऊन पाहत होते. शहराच्या अनेक भागात नागरिकांना पिण्यास पाणी नाही, मात्र फडके रोडवर पाण्याची उधळपट्टी चालल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात होती. अयोध्येतील राम मंदिराचा प्राणप्रतिष्ठा सोहळा दूरदृश्य प्रणाली दारे फडके रोडवरील आप्पा दातार चौकात नागरिकांना दाखवण्यात येणार आहे. यानिमित्ताने या रस्त्यावर स्वच्छता असावी या उद्देशाने ही सफाई करण्यात आली आहे. श्री गणेश मंदिरा संस्थानच्या पुढाकाराने हे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. तसेच पालिकेच्या फ प्रभागाकडून फडके रस्ता, चिमणी गल्ली, नेहरू रस्ता भागात स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते.

सहाय्यक आयुक्त चंद्रकांत जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली.अशाच प्रकारे पालिका अधिकाऱ्यांनी नियमित फडके रस्ता, चिमणी गल्ली, नेहरू रस्ता भागातील फेरीवाल्यांवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# कल्याणमध्ये श्रीराम दर्शनाचे निमित्य करून महिलेची अडीच लाखाची फसवणूक




■डोंबिवली। प्रतिनिधी,

आम्ही तुम्हाला श्रीरामाचे दर्शन घडवून आणतो, असे एका जेष्ठ नागरिक महिलेला सांगून तीन भामट्यांनी ज्येष्ठाची बुधवारी फसवणूक केली आहे.कल्याण पश्चिम येथील खडकपाडा भागातील लोटस डेंटल केअर सेंटर येथेही फसवणुकीची घटना घडली आहे.

तक्रारदार महिला बुधवारी दुपारी खडकपाडा भागातून पायी चालल्या होत्या . यावेळी त्यांना तीन भामट्यांनी अडवले. आम्ही राम भक्त आहोत. आम्ही तुम्हाला प्रभू रामचंद्रांचे दर्शन घडवून आणतो. यासाठी तुम्ही तुमच्या हातातील सोन्याच्या बांगड्या, इतर सोन्याचा ऐवज पिशवीत गुंडाळून ठेवा, असे भामट्यांनी महिलेला सांगितले.

भामट्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवून तक्रारदार महिलेने जवळील दोन लाख 66 हजाराचा सोन्याचा ऐवज पिशवीत गुंडाळला. हा ऐवज कुणी चोरू नये म्हणून भामट्यांनी स्वतःजवळ घेतला. आपणास रामाचे दर्शन होत आहे या आनंदात महिला होती. तेवढ्यात तिन्ही भामट्यांनी महिलेला एकाएकी सोडून तिथून पळकाढला.

# देशभरातील पन्नास टक्क्यांहून अधिक प्राथमिक शिक्षकांकडे किमान पात्रतेचा अभाव

■मुंबई। प्रतिनिधी,

देशभरातील प्राथमिक शिक्षकांपैकी पन्नास टक्क्यांहून अधिक शिक्षक हे शिक्षणशास्त्र पदविका, पदवी असे किमान पात्रता निकष पूर्ण करणारे नाहीत, तर बहुसंख्य शाळांमध्ये गणित, विज्ञान आणि इंग्रजी अध्यापनासाठी त्या विषयांतील पदवीधर शिक्षक नसल्याचे टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसने केलेल्या अभ्यासातून उघड झाले आहे.

असरच्या अहवालातून नुकतेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अधोगतीचे दाखले मिळाल्यानंतर आता देशभरातील शाळांमधील शिक्षकांची स्थितीही फारशी बरी



नसल्याचे टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसच्या सेंटर फॉर एक्सलन्स इन टीचर्स एज्युकेशनने केलेल्या अभ्यासाच्या निष्कर्षांतून दिसते आहे. देशभरातील प्राथमिक शिक्षकांपैकी अवघे ४६ टक्के शिक्षक हे शिक्षणशास्त्रातील पदविकाधारक (डीएड), किंवा पदवीधारक (बीएड) आहेत. खासगी शाळांमध्ये अपात्र शिक्षकांची संख्या तुलनेने अधिक आहे. पदवीचे शिक्षण ज्या विषयात घेतले आहे त्याच विषयाचे अध्यापन करण्याची संधी ६८ ते ७० टक्के शिक्षकांना मिळाली असली तरी गणित, विज्ञान, इंग्रजी विषय शिकवण्यासाठी शिक्षकांची कमतरता आहे.

त्यामुळे शिक्षण गणित विज्ञान किंवा इंग्रजी विषय शिकवण्यासाठी पदवीचे शिक्षण या विषयांतील नसलेल्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. हे विषय शिकवणाऱ्या शिक्षकांपैकी ३५ ते ४० टक्के शिक्षकांची पदवी गणित, विज्ञान किंवा इंग्रजी विषयांतील नाही.